दैनिक महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Legrand HAVELLS Finolex KOLORS USHA PHILIPS SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

लातूर वर्ष ३ रे अंक १२९ वा मंगळवार दि.१० ऑक्टोंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# मोहम्मद फैजल यांच्या शिक्षेला सुप्रीम कोर्टाची स्थगिती



मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला काही दिवसांपुर्वी मोठा धक्का बसला होता. राष्ट्रवादीचे लक्षद्वीपचे खासदार मोहम्मद फैजल यांना लोकसभेतून अपात्र ठरवण्यात आलं होतं. मात्र, शरद पवार गटाच्या या नेत्याला सुप्रीम कोर्टाकडून दिलासा मिळाला असून त्यांना सुप्रीम कोर्टाकडून खासदारकी पुन्हा बहाल करण्यात आली आहे.२००९साली केरळ उच्च न्यायालयाने मोहम्मद फैजल यांच्याविरोधात हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा नोंदवण्यात आला होता. त्यांना या आरोपाखाली १० वर्षांची शिक्षा देखील सुनावण्यात आली होती. या शिक्षेच्या निर्णयाला स्थगिती मिळावी यासाठी त्यांनी केरळ उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, केरळ उच्च न्यायालयाने त्यांच्या शिक्षेच्या निर्णयाला स्थगिती दिली नाही. ज्यामुळे लोकसभेने त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई केली. त्यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात शिक्षेला स्थगिती मिळावी यासाठी दाद मागितली.ज्यानंतर सुप्रीम कोर्टाने त्यांना खासदारकी पुन्हा बहाल केली.या वर्षात राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार मोहम्मद फैजल यांच्याविरोधात दोन वेळा अपात्रतेची कारवाई करूण्यात आली आणि पुन्हा खासदारकी बहाल करण्यात आली. शरद पवार आणि अजित पवार गट यांच्यातील पक्ष चिन्हाचा वाद निवडणुक आयोगासमोर होता. यावर सुनावणी सुरु असतानाच फैजल यांची खासदारकी रद्द करूण्यात आली होती. कावरट्टी येथील सत्र न्यायालयाने जानेवारी महिन्यात मोहम्मद फैजल आणि इतर तिघांवर पी. सालीहच्या हत्येचा प्रयत्न केल्याच्या आरोपाखाली ट्रायल कोर्टाने सर्व आरोपींना १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली होती.

## भारताची सागरी क्षेत्रातील महाशक्तीकडे वाटचाल : श्रीपाद नाईक

पुणे : भारताला मोठा सागरी किनारा लाभला आहे. त्यामुळे समुद्र हा कायमच आपल्या संपत्ती व समृद्धीचा स्त्रोत राहिलेला आहे. त्यात भारतातील ८५ टक्क्यांपेक्षा अधिक खलाशी हे विदेशातील सागरी क्षेत्रात कार्य क्षेत्रात कार्यरत असून त्यात महिला खलाशांची संख्या लक्षणीय आहे. त्यामुळे भारत सागरी क्षेत्रातील महाशक्ती होण्याकडे वाटचाल करत असून हाच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी परिभाषेतील देशाचा अमृतकाळ आहे,’ असे मत पोत परिवहन व जलमार्ग खात्याचे केंद्रीय राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी व्यक्त केले.ते एमआयटी आर्ट, डिजाईन व टॅक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणेच्या महाराष्ट्र अॅकेडमी फॉर नॅवल एज्युकेशन व ट्रेनिंग (मॅनेट) च्या जागतिक सागरी सप्ताहा निमित्ताने बालगंधर्व रंगमंदीर येथे आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी, शिपिंग विभागाचे महासंचालक श्याम जगन्नाथन, सिनर्जी मरिन ग्रुपचे कॅप्टन डॉ. शशांक जहागिरदार, श्पिंगचे उपमहासंचालक डॉ.पांडूरंग राऊत, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कुलगुरू तथा कार्याध्यक्ष प्रा.डॉ.मंगेश कराड, कुलसचिव डॉ.महेश चोपडे, कॅप्टन आशा एस. अलगप्पा, कॅप्टन केदार चौधरी, कॅप्टन श्रीरंग गोखले, संजीव ओगले, सुहास मते, मिनिनाथ झगडे, उदय पुरी, उदय सुभेदार, राजाराम लहाने, गजानन केंद्रे आदी मान्यवर उपस्थित होते.नाईक पुढे म्हणाले, मर्चंट नेव्हीमध्ये महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकारच्या वतीने ट्रेनिंग दरम्यान १ लाखांची शिष्यवृत्ती देण्यात येते. त्यामुळे अधिका-अधिक महिलांना या क्षेत्राकडे वळविण्याचा सरकारचा मानस आहे. ‘एमआयटी मॅनेट’ ही मर्चंट नेव्ही क्षेत्रातील भारतातील अग्रगण्य संस्था आहे. तरी मॅनेटच्या सप्ताहाच्या माध्यमातून मी सर्व कॅडेट्सला जागतिक सागरी दिनाच्या शुभेच्छा देऊ इच्छितो.

# लातूरचे नायब तहसीलदार कुलदीप देशमुख यांची निलंगा येथे बदली



लातूर :- लातूरचे पुरवठा विभागाचे कर्तव्यदक्ष, पारदर्शक नायब तहसीलदार कुलदीप देशमुख यांची निलंगा येथे नायब तहसीलदार महसूल २ या ठिकाणी बदली झाली आहे. लातूरचे पुरवठा विभागाचा चार्ज निवासी नायब तहसीलदार गणेश सरोदे यांच्याकडे देण्यात आला आहे.

# युवा पिढीने मोबाईल ऐवजी मैदानी खेळाकडे वळावे - ऋषिकेश कराड

लातूर :- आजच्या काळात युवा पिढीचा सर्वाधिक काळ मोबाईलच्या वापरात जात असून मानसिक आणि शारिरीक स्वास्थासाठी मैदानी खेळाकडे वळणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन लातूर एमआयटी वैद्यकीय महाविद्यालयाचे मानव संसाधन कार्यकारी ऋषिकेश रमेशअप्पा कराड यांनी केले. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशीक अंतर्गत छत्रपती संभाजीनगर मराठवाडा विभागीय क्रिडा चाचणी निवड स्पर्धा लातूर येथील महाराष्ट्र इस्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स अॅन्ड रिसर्च वैद्यकीय महाविद्यालयात ९ आणि १० ऑक्टोबर रोजी होत आहेत. या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी मानव संसाधन कार्यकारी ऋषिकेश दादा कराड हे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एन.पी. जमादार हे होते तर उपअधिष्ठाता डॉ. बी.एस. नागोबा, शैक्षणिक व प्रशासकीय संचालिका डॉ. सरीता मंत्री यांची प्रमुख उपस्थिती होती. या विभागीय क्रिडा निवड चाचणी स्पर्धेत बास्केट बॉल, व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो आणि इतर मैदानी स्पर्धा होवून विभागीय संघाची निवड केली जाणार आहे. या चाचणी निवड स्पर्धेत मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यातील ६५ हून अधिक सर्व प्रकारच्या महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला असून २५० हून अधिक मुले आणि मुली खेळाडू सहभागी झालेले आहेत. निवड झालेले संघ




११ ऑक्टेबर रोजी जळगाव येथे होणार्या अंतर विभागीय क्रिडा स्पर्धेत सहभागी होणार आहेत. मैदानी खेळ खेळण्याने अनेक फायदे असून मुख्य फायदा म्हणजे शरीर स्वस्थ राहतं. शरीराचा व्यायाम होतो, आणि शरीर तंदुरुस्त राहते. मैदानी खेळ खेळल्याने व्यायाम होतो, नेतृत्वगुण विकसित होऊ लागतो. मैदानी खेळात संपूर्ण शरीराची हालचाल होते. मैदानी खेळ खेळल्याने शारिरीक विकास होतो, यातूनच शरीर नेहमी प्रसन्न राहते. कोणतेही काम सहजरीत्या करता येते. मानसिक त्रासापासून सुटका होते. मैदानी खेळ खेळताना सगळी ज्ञानेद्रिय कार्यरत असतात. त्यामुळे आपली एकाग्रता वाढीस लागते. अभ्यासात किंवा इतर कोणतेही काम एकाग्रतेने करता येते. असे सांगून ऋषिकेश दादा कराड यांनी युवा पिढीने मोबाईल ऐवजी क्रिडा मैदानवर व्यस्त रहावे असे आवाहन केले. यावेळी कु. प्रतिक्षा घागोडे या खेळाडूने आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन निवड चाचणी स्पर्धेचे विभागीय समन्वयक डॉ. जावेद सिद्धीकी यांनी केले. या स्पर्धेसाठी विविध महाविद्यालयातील डॉ. एम. जी. घोगाडे, प्रा. राहूल लहाने, प्रा. शिवाजी कदम, प्रा. ज्ञानोबा घुले, प्रा. अमित कदम, प्रा. दिपक पाटील, प्रा. प्रकाश आहेरेकर, प्रा. कांबळे, प्रा. एस. पी. पैठणे, प्रा. विश्वनाथ पावडशेट्टे हे पंच म्हणून काम पाहत आहेत. निवड चाचणी क्रिडा स्पर्धे ला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे.

# मुरुड आणि पानगाव रेल्वे स्थानकावरून धावणाऱ्या जलद रेल्वेंना लवकरच थांबा

लातूर :- लातूर ग्रामीण विधानसभा कार्यक्षेत्रात असलेल्या मुरुड आणि पानगाव या दोन्ही रेल्वे स्थानकातून जलद गतीने धावणाऱ्या रेल्वे गाड्यांना थांबा देण्याबाबत तातडीने कार्यवाही केली जाईल अशी ग्वाही केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री ना. रावसाहेब दानवे पाटील यांनी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांना दिली.

भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी दिल्ली येथे केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री ना. रावसाहेब दानवे पाटील यांची त्यांच्या निवासस्थानी सोमवारी सकाळी भेट घेऊन रेल्वे प्रवासाच्या अडचणी बरोबरच विविध विषयावर चर्चा केली यावेळी उद्योजक जगदीश कुलकर्णी हे होते.

औद्योगिक दृष्ट्या विकसित होत असलेल्या लातूर तालुक्यातील मुरुड येथील रेल्वे स्थानकावर कोरोना काळापासून काही रेल्वेचा थांबा बंद करण्यात आला आहे. यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत असून थांबा बंद करण्यात आलेल्या आणि जलद गतीने धावणाऱ्या रेल्वेंना मुरुड रेल्वे स्थानकावर



थांबा देण्यात यावा. त्याचबरोबर रेल्वे स्थानकावर ऑपरेटिंग स्टेशन कार्यान्वित करून भौतिक सोई सुविधा उपलब्ध करून द्याव्यात तसेच रेणापूर तालुक्यातील पानगाव येथे भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी नागपूर नंतर केवळ पानगाव येथेच आहेत. या अस्थिच्या दर्शनासाठी महाराष्ट्रभरातून अनुयायी मोठ्या संख्येने पानगाव येथे येत असल्याने पानगाव येथील रेल्वे स्थानकावरून जलद गतीने धावणाऱ्या रेल्वेंना थांबा देऊन होणारी जनतेची गैरसोय दूर करण्याची मागणी एका निवेदनाद्वारे आ. रमेशअप्पा कराड यांनी केली असता केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील यांनी मुरुड आणि पानगाव या दोन्ही रेल्वे स्थानकावर जलद गतीने धावणाऱ्या रेल्वेंना लवकरात लवकर थांबा मिळावा याकरिता उचित कार्यवाही करण्यात येईल असे सांगून रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांना याबाबतच्या सूचना केल्या.

# भाजपा कार्यकर्ते चंद्रकांत कातळे यांची मध्य रेल्वेच्या क्षेत्रीय समितीवर निवड

लातूर : - लातूर जिल्हा भारतीय जनता पार्टीचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख रेणापूर येथील सक्रिय कार्यकर्ते चंद्रकांत कातळे यांची मध्य रेल्वेच्या क्षेत्रीय सल्लागार समिती अर्थात झेडआरयुसीसी या उच्चस्तरीय समितीवर निवड झाली आहे.



मध्य रेल्वे हा भारतीय रेल्वेतील एक महत्त्वाचा विभाग आहे. मध्य रेल्वेच्या महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, सोलापूर, भुसावळ, नागपूर या उपविभागासह ईशान्य कर्नाटकातील काही व दक्षिण मध्य प्रदेशमधील काही रेल्वेमार्ग मध्य रेल्वेच्या अखत्यारीत येतात. रेल्वे स्थानकावर विविध सुविधा उपलब्ध करून देणे, समितीच्या कार्यक्षेत्रात नवीन रेल्वे स्थानकाचा प्रस्ताव सादर करणे, रेल्वेच्या वेळापत्रकासंबंधी व्यवस्था, रेल्वे द्वारा प्रवाशांच्या विविध सुविधांमध्ये सुधारणा करणे आदी कामे समितीच्या माध्यमातून केली जातात.

रेल्वे मंत्रालय अंतर्गत असलेल्या झेडआरयुसीसी या उच्चस्तरीय समितीवर भाजपाचे चंद्रकांत कातळे यांची निवड झाली आहे या निवडीबद्दल त्यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे. मध्य रेल्वेच्या उच्चस्तरीय समितीवर काम करण्याची संधी दिल्याबद्दल केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीशजी महाजन, माजी पालकमंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर, खा. सुधाकर शृंगारे, आ. रमेशआप्पा कराड, आ. अभिमन्यू पवार भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख यांच्यासह भाजपाच्या सर्व मान्यवर नेत्यांचे चंद्रकांत कातळे यांनी आभार व्यक्त केले आहेत.

# मनसैनिकांची पोलिसांकडून धरपकड

मुंबई : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी टोलबाबत घेतलेल्या आक्रमक पवित्र्यानंतर मनसैनिकांनी टोल नाक्यावर उभे राहत चार चाकी वाहने सोडली. त्यानंतर पोलिसांनी मनसैनिकांची पोलिसांनी धरपकड केली. वाशी आणि दहिसर टोल नाक्यावरून कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले.मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोमवारी ९ ऑक्टोबर रोजी पत्रकार परिषद घेत टोलच्या मुद्यावर आक्रमक भूमिका घेतली. वाहन चालकांना टोल न देण्याचे आवाहन राज यांनी केले. ज्या टोल नाक्यावरून टोल घेतला जाईल, तो टोल नाका पेटवून देण्याचा इशारा राज ठाकरे यांनी दिला. राज यांच्या पत्रकार



परिषदेनंतर मनसैनिकांना टोल नाक्यावर जात वाहने टोलशिवाय सोडण्यास सुरुवात केली.मनसैनिकांच्या आक्रमक पावित्र्यानंतर पोलिसांनी परिस्थिती चिघळू नये यासाठी टोल नाक्यावर धाव घेतली. वाशी टोल नाक्यावर आंदोलन करणा-या मनसे कार्यकर्त्यांना पोलीसांनी ताब्यात घेतले. मनसेच्या २५ ते ३०कार्यकर्त्यांना वाशी पोलिसांनी ताब्यात घेत त्यांना पोलीस ठाण्यात नेले.तर, दुसरीकडे पश्चिम द्रुतगती महामार्गावरील दहिसर टोल नाक्यावर आंदोलन करणा-या मनसे कार्यकर्त्यांची पोलिसांनी धरपकड केली. या ठिकाणाहून २० ते २५ मनसे कार्यकर्त्यांना दहिसर पोलिसांनी ताब्यात घेतले.दहिसर पोलिसांना मनसे कार्यकर्त्यांनी पोलिसांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चार चाकी वाहनांच्या टोल माफीबाबत केलेल्या वक्तव्याची व्हिडीओ क्लिप दाखवली.

# वाढती स्पर्धा तणावाचे प्रमुख कारण : भास्कर मगर

मानवत : संकट कितीही मोठे असले तरी हिमतीने सामोरे गेल्यास त्याच्यावर तोडगा निघतो. कोणत्याही संकटाचा त्रागा करून घेण्याचे काही एक कारण नाही. ईर्षा, द्वेषभाव आणि वाढत्या अपेक्षांमुळे आपुलकी लोप पावत चालली आहे. समाजातील वाढती स्पर्धा ही देखील तणावाचे एक निश्चित कारण मानले जाते, असे हॅप्पीनेस प्रोग्राममध्ये प्रशिक्षक भास्कर मगर यांनी सांगितले.मानवत शहरातील के. के. एम. महाविद्यालयाच्या स्व. पन्नालालजी चांडक सभागृहामध्ये ४ ते ८ ऑक्टोबर या पाच दिवसाचा हॅप्पीनेस प्रोग्राम शिबिर आयोजित केले होते.या शिबिरात पाच दिवसांमध्ये ताणतणावातून मुक्तता मिळण्यासाठी आनंदाकडे वळा या आशयाखाली प्राणायाम, सुदर्शन क्रिया आदिची सखोल माहिती देत तणावातून बाहेर निघण्यासाठी मदत करण्यात आली. ८ ऑक्टोबर रोजी या कार्यक्रम समारोप प्रसंगी प्रशिक्षक भास्कर मगर यांनी सांगितले की, संकटांना घाबरून कोणाचेही भले झाले नाही. देशातील मोठमोठे उद्योगपती कर्जबाजारी होतात तिथे सामान्य आणि शेतक-यांच्या अवस्थेची कल्पनाच न केलेली बरी. तथापि निराशाचे कारण कोणतेही असले तरी कोणीही आपला लाख मोलाचा जीव गमावू नये असा संदेश दिला.हॅप्पीनेस प्रोग्राम या शिबिराचे आयोजन आर्ट ऑफ लिविंग परिवाराने केले होते. या शिबिरासाठी प्रशिक्षक म्हणून भास्कर मगर, सूर्यप्रकाश तिवारी, सुनीलमामा बोरबने होते.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# सरकारी अनास्था व आजारी आरोग्य व्यवस्था !

ण्यापाठोपाठ नांदेड व छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात झालेल्या मृत्युकांडामुळे राज्याच्या आरोग्य व्यवस्थेचे धिंडवडे निघाले आहेत. कोविडच्या संकटाने आपली आरोग्य व्यवस्था किती तकलादू आहे हे दाखवून दिले होते. तेव्हा तात्पुरत्या व्यवस्था उभारून वेळ मारून नेता आली. संपूर्ण जगावरच हे अनपेक्षित संकट ओढवले होते त्यामुळे त्यातील उणीवा स्वीकारल्या गेल्या. त्यावर कोणी फारशी टीका केली नाही. पण या संकटातून आपण कोणताही धडा शिकलो नाही व संकटाचे सावट दूर होताच सगळं कसं पूर्वपदावर आलंय ते परवाच्या घटनांमुळे स्पष्ट झाले. राज्यात गेल्या वर्षभरापासून फक्त राजकीय साठमारी सुरू आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत नसल्याने बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार अधिका–यांच्या हातात आहे. खाली जाब विचारायला कोणी नाही व राज्यात सत्तेत बसलेल्यांना अशा गोष्टींकडे बघायला वेळ नाही. त्यामुळे सगळीकडे आनंदी आनंद आहे. सरकारी दवाखान्यात सर्वांना मोफत उपचार देण्याचा, सर्वत्र स्व. बाळासाहेब ठाकरे दवाखाने सुरू करण्याच्या घोषणा झाल्या. पण रुग्णालयाच्या सध्याच्या दुरवस्थेबाबत कोणालाच फारसे सोयरसुतक दिसत नाही. तीन रुग्णालयांत शंभराहून अधिक बळी गेल्यानंतर आजारी आरोग्यव्यवस्थेची दयनीय स्थिती जगासमोर आली आहे.कोविडनंतर अनेकांचे रोजगार गेले आहेत, थोडीफार बचत होती, ती आटली आहे. त्यामुळे खाजगी दवाखान्यात उपचार घेणे अनेकांना आज परवडत नाही. परिणामी सरकारी रुग्णालयावरील ताण वाढला आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा विस्तार केला गेला नाही. किंबहुना आहेत त्या दवाखान्याची अवस्था लोकांनी तिकडे फिरकूच नये अशी करून ठेवण्यात आली आहे. औषध खरेदीवर दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात, पण कुठल्याच दवाखान्यात रुग्णांना सगळी औषधं दिली जात नाहीत. नांदेडच्या रुग्णालयात १२७ प्रकारची औषधं उपलब्ध होती, औषधाची कुठलीही कमतरता नव्हती, असा दावा मुख्यमंत्र्यांनी केला. जर ही वस्तुस्थिती होती तर रुग्णांना बाहेरून औषधं आणण्यास का सांगितले जात होते. सरकारने खरेदी केलेली औषधं नेमकी कुठे जात होती ? हा प्रश्नच आहे. हीच स्थिती सरकारी रुग्णालयातील उपकरणांची आहे. नांदेडच्या रुग्णालयातील एक्स–रे मशिन तीन महिन्यांपासून बंद होती. उपकरणांची देखभाल करण्यात येत नाही,त्यासाठी केलेल्या कंत्राटांची मुदत संपली तरी सहा–सहा महिने नूतनीकरण होत नाही. आज महाराष्ट्रातील कोणत्याही रुग्णालयात आपण गेलात तर कोट्यवधी रुपये किमतीच्या अनेक मशिन भंगारात पडलेल्या दिसतील. कोविडच्या संकटात अनेकांनी हात धुऊन घेतले. तातडीची गरज म्हणून निविदा न मागवता अनेक मशिन्स खरेदी करण्यात आल्या. हजारो व्हेंटिलेटर खरेदी करण्यात आले. दोन वर्षांत ती कुठे गेली, भंगारात विकण्यासारखी स्थिती का आली? या प्रश्नाचे उत्तर आज कोण देणार? आरोग्य विभागातील हजारो पदं आज रिक्त आहेत. एकाही सरकारी रुग्णालयात शंभर टक्के मंजूर पदं भरलेली दिसत नाहीत. अर्थात ही स्थिती काही एका दिवसात निर्माण झालेली नाही. त्यामुळे एकाच सरकारला दोषी धरता येणार नाही. त्यात परत सगळीकडे कंत्राटी कर्मचारी भरतीचे पेव फुटले आहे. सरकारवरचा आर्थिक भार कमी करण्यासाठी कंत्राटी शिक्षण सेवक, आरोग्य सेवक नेमण्याची पद्धत सुरू झाली आहे. भरतीची प्रक्रियाही लोकसेवा आयोग किंवा अन्य सरकारी यंत्रणेमार्फत करण्याऐवजी खाजगी कंपन्या नेमण्यात आल्या आहेत. शिक्षण, आरोग्य ही क्षेत्रे राज्याच्या दीर्घकालीन प्रगतीची इंजिने असतात. त्यांच्याबाबतीत तरी सत्तेत बसलेल्या लोकांनी एवढी अनास्था दाखवू नये ही माफक अपेक्षा सर्वांची असेल. दोन–तीन रुग्णालयांत एवढ्या मोठ्या प्रमाणात बळी गेल्याने चौकशांचे नाटक व दीर्घकालीन धोरणाच्या गप्पा होतील. महिनाभरात हा विषय मागे पडेल. पुन्हा जेव्हा असेच कुठेतरी मृतदेहाचे ढीग लागतील तेव्हा हीच चर्चा होईल. हीच अनास्था आजच्या दयनीय अवस्थेला कारणीभूत ठरली आहे.राष्ट्रवादीवरील हक्काची ओंगळवाणी लढाई ! राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात उभी फूट पाडून भाजपाबरोबर सत्तेत सहभागी झालेल्या अजित पवार यांनी पक्षाच्या नावावर व चिन्हावर हक्क सांगितला असून, देशाच्या निवडणूक आयोगासमोर मागच्या आठवड्यात याबाबत पहिली सुनावणी झाली. स्वत: शरद पवार या सुनावणीसाठी निवडणूक आयोगाच्या कार्यालयात उपस्थित होते. निवडणूक आयोग कोणाचा दावा मान्य करणार, कोणाला नाव व चिन्ह देणार? की दोघांचाही दावा अमान्य करून चिन्ह गोठवणार ? याबाबत यथावकाश निर्णय येईल. पण पहिल्या दिवशीच्या सुनावणीत दोन्ही बाजूच्या वकिलांनी केलेले युक्तिवाद पाहता ही लढाई ओंगळवाणी व निष्ठावंत कार्यकर्त्यांना उद्विग्न करणारी असेल हे स्पष्ट झाले. अजित पवार गटाचे वकील मनिंदर सिंग यांनी, शरद पवार हे मनमानी व हुकूमशाही पद्धतीने पक्ष चालवतात, परस्पर स्वाक्षरी करून पदाधिका–यांच्या नियुक्त्या करतात, पक्षांतर्गत निवडणुका होत नाहीत. त्यांची पक्षाध्यक्षपदी झालेली निवड, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची नियुक्ती पक्षाच्या घटनेविरुद्ध आहे, असे आरोप अजित पवार गटाकडून करण्यात आले. तर शरद पवार यांच्या वकिलांनी अजित पवारांनी दाखल केलेली कागदपत्रंच बनावट आहेत, त्यात एका मृत व्यक्तीचेही प्रतिज्ञापत्र असल्याचा गंभीर आरोप केला. केवळ दोन तासांच्या सुनावणीत एवढी झटापट झाली, तर दीर्घकाळ चालणा–या या लढाईत काय काय आरोप–प्रत्यारोप होतील हे सांगणे कठीण आहे. या सुनावणीनंतर शरद पवार यांनी प्रतिक्रिया देण्याचे टाळले.पण त्यांच्या गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिलेली प्रतिक्रिया खूप बोलकी होती. ‘घरातला लहान मुलगा मोठा होतो. मग त्याला स्वतंत्र व्हायचं असतं, म्हणून तो स्वत:चं वेगळं घर बांधतो. परंतु, तो त्याच्या वडिलांना घराबाहेर काढत नाही.’ ही त्यांची प्रतिक्रिया अनेकांना भावली. २०१९ च्या निवडणूक प्रचारात त्यांनी पावसात केलेले भाषण निवडणुकीचा रंग बदलून टाकणारे ठरले होते. तशीच प्रतिक्रिया यावेळी आली तर.केवळ अजितदादाच नाही, तर त्यांना छत्रछायेखाली घेणा–या भाजपसाठीही किती अडचणीची ठरू शकते याची जाणीव परवाच्या सुनावणीने दिली आहे. शिवसेनेत फूट पडल्यानंतर सर्वोच्च न्यायालय, निवडणूक आयोग व आता विधानसभा अध्यक्षांपुढे जो संघर्ष सुरू आहे त्यावरून राष्ट्रवादीची पुढची वाट कशी असेल याची कल्पना सर्वांनाच आली असेल. अर्थात राष्ट्रवादीतील लढाई एवढी एकतर्फी नाहीय. दोन तृतीयांश आमदार, प्रमुख नेते अजितदादांसोबत असले तरी पक्ष संघटनेत तशी फूट पडलेली नाही. अजितदादांचे नेतृत्व मानणारे, त्यांच्याकडेच पवारांचा राजकीय उत्तराधिकारी म्हणून पाहणारेही अनेक जण ज्या पद्धतीने हे घडले त्यावर नाराज आहेत. ८४ व्या वर्षी, आयुष्याच्या या टप्प्यावर शरद पवारांना कोर्टाची पायरी चढायला लावल्याबद्दल त्यांच्यात रोष दिसतो आहे. न्यायालयात आपले दावे सिद्ध करण्यापेक्षा हा रोष कमी करण्याचे मोठे आव्हान अजित पवार गटापुढे असणार आहे.संख्याबळाचा दावा करताना अजित पवार गटाने विधानसभेचे ४२, विधान परिषदेचे ६ आमदार, तसेच नागालँडमधील ७ आमदार, लोकसभा आणि राज्यसभेचे प्रत्येकी एक खासदार आपल्यासोबत असल्याचा दावा केला. अजित पवार यांची ३० जूनला (३ जुलैला उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेण्यापूर्वी) बहुमताने अध्यक्षपदी निवड झाली आहे. पक्षाचे मुख्य प्रतोद अनिल पाटील हे ही आमच्याबरोबर आहेत. कोअर कमिटीतील सदस्यही आमच्याबरोबर आहेत, असाही दावा अजित पवार गटाकडून करण्यात आला आहे. तर एक गट बाहेर पडला म्हणून पक्ष फुटला असे म्हणता येत नाही. मूळ पक्ष आजही आमच्याकडे आहे. २४ राज्यांच्या प्रदेशाध्यक्षांचा शरद पवारांना पाठिंबा आहे. पक्षाची स्थापना शरद पवारांनी केली. शरद पवार यांची अध्यक्षपदी निवड पक्ष घटनेला धरून आहे. त्यामुळे शरद पवार हेच राष्ट्रीय अध्यक्ष आहेत, असे स्पष्ट करत, अंतिम निर्णय होईपर्यंत चिन्ह गोठवू नये, असे शरद पवार गटाकडून सांगितले गेले. कोणतीही व्यक्ती, खोटी कागदपत्रं सादर करून काल्पनिक वाद निर्माण करू शकत नाही.अजित पवार गटाकडून निवडणूक आयोगासमोर सादर करण्यात आलेल्या काही कागदपत्रांबाबतच शंका आहे. एका मृत व्यक्तीचे प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले आहे. दुस–याच एका पक्षातील बडा नेता आमच्या गटात असल्याचेही अजित पवार गटाकडून सांगण्यात आल्याचा आरोपही शरद पवार यांची बाजू मांडणा–या अभिषेक मनू सिंघवी यांनी केला आहे. पुढची सुनावणी सोमवारी होणार असून,तेव्हा आणखी काय काय दावे केले जातात ते बघावे लागेल. पण काल–परवापर्यंत दैवत म्हणणारे लोक एकदम तुम्हाला दानव ठरवायला मागेपुढे पाहात नाहीत, ही बाब व्यथित करणारी आहे. शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि जितेंद्र आव्हाड यांनी हेच वास्तव लोकांपर्यंत पोचवायचे हे ठरवलेलं दिसतंय.जमवलेल्या गर्दीमुळे भाजपाचीच घुसमट !गेल्या तीन महिन्यांपासून रखडलेल्या पालकमंत्रिपदाच्या नियुक्त्यांना अखेर परवा मुहूर्त मिळाला. उपमुख्यमंत्री अजित पवार आजारी पडले व सरकारमध्ये धावाधाव झाली. त्यांच्या आजारपणावर पालकमंत्र्यांची नियुक्ती हीच एकमेव मात्रा परिणामकारक ठरू शकते याची जाणीव भाजपाच्या नेत्यांना असावी. त्यामुळे त्यांनी मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तातडीने दिल्लीला बोलावले व औषध द्यायला सांगितले. पुणे, कोल्हापूर, बीडसह सात जिल्ह्यांची पालकमंत्रिपदं राष्ट्रवादीच्या मंत्र्यांकडे सोपवण्यात आली. पुण्याचे पालकमंत्रिपद सोडायला अजिबात तयार नसलेल्या चंद्रकांत पाटलांना हुतात्मा एक्स्प्रेसने सोलापूरला पाठवण्यात आले. नाराजी कमी करण्यासाठी अमरावतीचा अतिरिक्त बोनस देण्यात आला. शिंदे गटाने नाशिक सोडले नाही, पण कोल्हापूर सोडावे लागले. इंग्रजीत एक म्हण आहे, ळ६ङ्म’२ ङ्मेस्त्रंल्ल८, ३ँ११ी’२ ं ू१ङ्म६ असं म्हणतात. दोघांचं बहुमत असताना, सरकार व्यवस्थित सुरू असताना तिसरा आणला असेल तर गर्दी तर होणारच की. पक्षाच्या व्यापक हितासाठी व दीर्घकालीन राजकारणासाठी त्याग करावा लागतो हे भाजपाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना आता चांगलंच समजायला लागलंय. परंतु एवढा त्याग केलाच आहे, तर बाहेरून पाठिंबा दिलेला काय वाईट होता, असं काहींना वाटत असेल तर त्याना दोष तरी कसा द्यायचा. चालायचंच.

# मुलांना सांगा या १० महत्वाच्या टिप्स!




मुलांना आपण खऱ्या जगण्यातल्या स्वच्छतेबद्दल शिकवतो तसंच डिजिटल स्वच्छतेबद्दलही शिकवलं पाहिजे. मुलांमध्ये ॲप्स डाउनलोड करण्याचं प्रमाण प्रचंड असतं. दर वेळी ते प्ले स्टोअर किंवा ॲपल स्टोअरमधूनच ॲप डाउनलोड करतात असं नाही, मुलं एकमेकांना वेगवेगळ्या ॲप्सच्या लिंक्स पाठवत असतात. यात प्रामुख्याने गेमिंगची ॲप्स असतात. पण या लिंक व्हेरीफाईड असतीलच असं नाही. अनेकदा या लिंक्समधून व्हायरस फोनमध्ये शिरतो. फोन हँग होणे, स्लो होणे अशा अनेक गोष्टी भलत्या सलत्या लिंक्सवरुन ॲप्स डाउनलोड केल्यामुळे होतात.मुलांच्या हातात फोन देताना आणि मोठ्यांच्या जगाने स्वतःही निरनिराळी ॲप्स डाउनलोड करताना काही गोष्टींची काळजी घेतली पाहिजे. १० महत्वाच्या टिप्स! सगळ्यात पहिली आणि महत्वाची गोष्ट कधीही कुठल्याही लिंकवरुन ॲप डाउनलोड करू नये.मुलांना हे सांगितलं पाहिजे, कितीही भारी गेम असू देत, फुकट आहे असं लिंक बरोबरच्या मेसेजमध्ये लिहिलेलं असू देत, तरीही त्या लिंकवर क्लिक करुन गेम डाऊनलोड करण्याचा मोह टाळला पाहिजे. कारण त्यामुळे तुमचा फोन हँग होऊन, तुमचा सगळा डेटा म्हणजे फोनमधले कॉन्टॅक्ट, फोटो, व्हिडीओ आणि इतर माहिती चोरीला जाऊ शकतात.अशा लिंक्समधून काहीवेळा हॅकर्स आपल्या फोनमध्ये बॅक डोअर एंट्री घेऊ शकतात. म्हणजे आपला फोन हॅक झालेलं आपल्याला समजत नाही, पण फोनचा संपूर्ण ॲक्सेस हॅकरला मिळालेला असतो. कुठलंही ॲप आणि गेम डाउनलोड करण्याआधी त्याचं रेटिंग बघायला मुलांना शिकवा. हे रेटिंग चार किंवा त्यापेक्षा जास्त असलंच पाहिजे. शिवाय ते रेटिंग हजारो–लाखो–करोडो लोकांनी दिलेलं असलं पाहिजे. पाचपन्नास लोकांत चार किंवा त्यापेक्षा जास्त रेटिंगला अर्थ नसतो.रेटिंग बरोबरच कॉमेंट्स दिलेल्या असतात त्याही वाचायला हव्यात. ही सवयही मुलांना लावण्याचा प्रयत्न करा. त्यावरून ॲप व्यवस्थित चालतंय ना, जाहिरातींचा भडीमार आहे की नाही, फोनची किती जागा घेतं, ॲप डाउनलोड केल्यावर फोन स्लो होतो का ही सगळी माहिती समजते.ॲप स्टोअर मध्ये ‘एडिटर्स चॉइस’ दिलेला असतो. ती प्स व्हेरीफाईड म्हणजे चांगली आहेत ना? याची खात्री करून घेतलेली असतात; त्यामुळे तशी ती सुरक्षित मानता येऊ शकतात.बहुतेक ॲप्स डाऊनलोड करताना आपणच सरळ सगळ्या परमिशन्स देऊन टाकतो. काही ॲप्सचा आपल्या फोनमधल्या फोटो गॅलरीशी, आपल्या फोनच्या लोकेशनशी काहीही संबंध नसतो तरीही आपण त्यांना या गोष्टी वापरण्याची परवानगी देतो कारण ते काय काय वापरणार आहेत याची यादी आपण अनेकदा बारकाईने बघतच नाही. असं करुन चालणार नाही. त्यामुळे ॲप्स डाउनलोड करताना ते व्हेरिफाय केलेले आहेत का, त्याचं रेटिंग किती आहे, डाउनलोड किती आहे, लोकांच्या प्रतिक्रिया काय आहेत हे सगळं बघितलंच पाहिजे.प्रत्येक ॲपवर ते कुठल्या वयोगटासाठी आहे हेही लिहिलेलं असतं. आपलं मुलं त्याच्या वयानुरुप ॲप डाउनलोड करतंय ना याकडे लक्ष हवं. कारण ॲप स्टोअरमध्ये १८+ ॲप्सही असतात.आपण जी ॲप्स गेल्या दोनचार महिन्यात वापरलेली नाहीत ती फोनमधून काढून टाकली पाहिजेत. जेणेकरुन फोनची स्पेस मोकळी राहील. आणि ज्या अर्थी इतक्या महिन्यात आपण ते वापरलेलं नाही, त्याचा अर्थ आपल्याला ते वरचेवर लागत नाही. अशी ॲप्स कधीही काढून टाकलेली बरी.कुठलंही ॲप आपल्याला कधीही डाउनलोड करता येऊ शकतं. त्यामुळे उगाच ॲप्सचा साठा फोनमध्ये करण्याची गरज नसते. हा डिजिटल कचरा वेळच्या वेळी काढून टाकला पाहिजे. मुलांना आपण खऱ्या जगण्यातल्या स्वच्छतेबद्दल शिकवतो तसंच डिजिटल स्वच्छतेबद्दलही शिकवलं पाहिजे. कारण आपण हायब्रिड आयुष्य जगतो आहोत आणि मुलांच्या हातात फोन्स आहेत.

# हरदीपसिंग निज्जरच्या हत्येचे सूत्रधार कोण?

सुवर्णमंदिरावरील ‘ऑपरेशन ब्लूस्टार’ कारवाईनंतर पंजाबच्या पोलीस महासंचालक पदावर काम केलेल्या लेखकाने खलिस्तान, कॅनडा आणि भारताचा कॅनडावरील आरोप यांबद्दल केलेले भाष्य.. ज्युलिओ रिबेरो आधीच सांगतो : या प्रश्नाचे उत्तर एका वाक्यात देता येणे अवघड आहे. भारतीय एजंट कॅनडात असून त्यांनीचे हे कृत्य घडविले, असा आरोप कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी केला आहे. त्यांच्या देशातील कायदेमंडळात, म्हणजे ‘लोकशाहीच्या मंदिरा’तच त्यांनी हा आरोप केला. एवढय़ावर न थांबता कॅनडाने तेथील भारतीय उच्चायुक्तालयातून एका वरिष्ठ अधिकाऱ्याची हकालपट्टी करून, त्या विशिष्ट अधिकाऱ्याबद्दल कॅनडाला संशय असल्याचे सूचित केले. या कारवाईला प्रत्युत्तर म्हणून आपणही दिल्लीमधील कॅनेडियन उच्चायुक्तालयातून त्यांच्या एका वरिष्ठाची हकालपट्टी केली. अशा प्रकारे ‘जशास तसे’ प्रत्युत्तर जेव्हा दिले जाते, तेव्हा त्या दोन देशांदरम्यानचे संबंध तणावपूर्ण आहेत हेच उघड होत असते. आपल्या ज्या वरिष्ठ अधिकाऱ्याला कॅनडाने अग्राह्य ठरवून हाकलले, त्यांनी वास्तविक भारत– पाकिस्तान सीमेवरून होणाऱ्या अमली पदार्थ तस्करीविरोधातील कारवाईचे नियोजन– व्यवस्थापन केले होते. कॅनडास्थित भारतीयांमधील खलिस्तानी प्रवृत्तींवरही हेच अधिकारी लक्ष ठेवून होते. असल्याच खलिस्तानी प्रवृत्तीच्या लोकांनी १९८५ मध्ये ‘एअर इंडिया’चे टोरांटोहून युरोपकडे निघालेले विमान बॉम्बस्फोटाने उडवले होते. आर्यलडच्या आकाशात तो स्फोट खलिस्तान्यांनी घडवला आणि ३०० हून अधिक प्रवासी तसेच वैमानिकासह सर्व कर्मचारी जिवाला मुकले.

हकनाक जीव गमावलेल्या या प्रवाशांपैकी ६५ कॅनडाचे नागरिक होते, तरीसुदधा आणि गुन्ह्याचे स्वरूप इतके भयंकर असूनसुद्धा आपल्या भूमीवरून एवढय़ा मोठय़ा गुन्ह्याचा कट कसा काय शिजला याचा कसून तपास करण्याची जगाची अपेक्षा कॅनडाच्या केंद्रीय पोलिसांनी (ज्यांना ‘आरसीएमपी’ – रॉयल कॅनेडियन माउंटन पोलीस– असे नाव आहे, त्या दलाने) पूर्ण केलीच नाही. शक्तिशाली बॉम्ब आणून सुखेनैव ठेवला जातो, ही एवढी स्फोटके सुरक्षा तपासणीच्या सर्व चाळण्यांतूनही विमानाच्या आत पोहोचतात, याची जबाबदारी निश्चित करून कर्मचाऱ्यांवरही कारवाई व्हायला हवी होती. पण ही अपेक्षा तर फोलच ठरली.बरे, एवढा जीवघेणा प्रकार घडल्यानंतरच्या काळात तरी कॅनडातील अधिकारी त्यांच्या देशामधील खलिस्तानी अतिरेक्यांबाबत अधिक सावधगिरी बाळगतील, ही अपेक्षा रास्त ठरते की नाही? तेवढेसुद्धा झाल्याचे दिसलेले नाही. उलट कॅनडामधील मूळ भारतीय वंशाचे काहीजण (पंजाबी) भारताचा तुकडा पाडून खलिस्तान निर्माण झालेच पाहिजे यासाठी उत्सुक दिसतात.. मग खुद्द त्यांचेच भारतातील नातेवाईक किंवा समधर्मीय लोक भारतामध्येच आम्ही सुखात आहोत आणि खलिस्तान आम्हाला मुळीच नको असे का म्हणेनात, या कॅनेडियन खलिस्तानोत्सुकांना त्याचे सोयरसुतक नसते. आमच्या देशात राहून तुमच्या मूळ देशाचे वासे मोजू नका, तुमच्याच मूळ देशाला अडचणीत आणण्यासाठी आमच्या देशाची भूमी वापरू नका, असे सांगण्याचा सरळपणा तरी कॅनडाच्या सरकाने दाखवावा की नाही? पण एखाद्या देशाला ‘मित्रदेश’ म्हणून, त्या देशाविरुद्ध आपल्या भूमीवरून आपलेच नागरिक वैर वाढवत असताना त्याकडे डोळेझाक करण्याचा प्रकार कॅनडाने सुरू ठेवला.जस्टिन ट्रुडो यांच्या ‘लिबरल पार्टी’कडे सत्ता टिकवण्यासाठी पुरेसे संख्याबळ नाही, त्यासाठी त्यांना ‘न्यू डेमोक्रॅटिक पार्टी’वर अवलंबूनच राहावे लागते. हा ‘न्यू डेमोक्रॅटिक पार्टी’ नामक पक्ष कॅनडाच्या एकंदर लोकसंख्येत दोन टक्के इतके प्रमाण असलेल्या शीख समुदायाने काढलेला असून त्यांच्याकडे कॅनडाच्या कायदेमंडळातील (पार्लमेण्टमधील) २५ जागा आहेत. या ‘न्यू डेमोक्रॅटिक पार्टी’चा आधार असल्याखेरीज ट्रुडोंच्या लिबरल पार्टीची सत्ता टिकूच शकत नाही. माझ्या पंजाब पोलिसांतील कारकीर्दीत (म्हणजे ३५ वर्षांपूर्वी) एकदा कॅनडाच्या सात–आठ खासदारांचे शिष्टमंडळ अमृतसरच्या भेटीसाठी आले होते. यापैकी अनेक खासदार शीख होते. त्या सर्वांना अशी ‘माहिती’ देण्यात आली होती की, शीख तरुण दिसला की मार त्याला ठार, हेच पंजाब पोलिसांचे काम आहे आणि त्यामुळेच तरुण शीख पुरुष सुवर्णमंदिर परिसरातही जाऊ शकत नाहीत. यात खोटेपणा किती ओतप्रोत भरलेला होता, याची खात्री हे शिष्टमंडळ सुवर्णमंदिरात पोहोचले तेव्हा त्यांनाही मिळालीच.एवढेच नव्हे, हे शिष्टमंडळ सुवर्णमंदिरात गेले तेव्हा अनेक शीख तरुण तेथे होते. तिथेच राहणाऱ्या आणि काही अगदी तरुण वयाच्या मुलांच्या डोक्यात खलिस्तानचे खूळ भरवून, कोवळय़ा वयात हाती शस्त्रे घेण्यास त्यांना भाग पाडले जाते आहे, हेही या शिष्टमंडळाने पाहिले. मग त्यांना प्रश्न पडला की हे असे आहे तर आपल्याला आपल्याच (कॅनेडियन) मतदारांकडून एवढी चुकीची माहिती का देण्यात आली असावी. याचे उत्तर त्यांना सांगण्याचे काम मी आमचे एक तरुण अधिकारी अविन्दरसिंग ब्रार (हेही आयपीएस आणि जन्माने जाट शीख) यांच्यावर सोपवले. अविन्दरसिंगने दिलेले उत्तर आजही आठवते : पंजाबातील शिखांपेक्षा कॅनडातील शीख निश्चितच अधिक सुखसोयीयुक्त जीवन जगताहेत. आपण इथे मजेत आहोत आणि पंजाबातील आपल्या भाईबंदांसाठी आपण काहीच करत नाही, याचा दोषगंड (गिल्ट कॉम्प्लेक्स) बाळगण्याऐवजी, ‘पंजाबातल्या आपल्या भाईबंदांसाठी पंजाब सरकार काहीच करत नाही’ असा दोषारोप ते करू लागले आहेत. वास्तविक, भारतभरच्या प्रत्येक शहरात शीख लोक आढळतात, ते मेहनती आणि हुन्नरी असल्यामुळे आर्थिकदृष्टय़ा सुस्थितीतही आहेत.

या उत्तराने कॅनडाचे पाहुणेसुद्धा अंतर्यामी हलले असावेत. त्यांनीही त्यांच्या देशाबद्दल सांगण्यात सुरुवात केली. भारत पारतंत्र्यात होता तेव्हापासून शिखांचे कॅनडात स्थलांतर होते आहे.. पहिल्या स्थलांतरित पिढीतले बहुतेक शीख हे व्हँकूव्हरला जंगल तोडून लाकडाचे ओंडके बनवण्यासाठी आले. एव्हाना त्या शहराची बहुसंख्य लोकसंख्या शीखच आहे. इतकी की, व्हँकूव्हर विमानतळावर पोहोचणाऱ्यांचे पासपोर्ट तपासणारे कर्मचारी बहुतेकदा शीखच असतात. आजही कॅनेडियनांना हे माहीत असायला हवे की, पंजाब हे राज्य भारताच्या अनेक भागांतील मोठय़ा लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा करतेच, शिवाय याच राज्याने भारतीय सेनादलांना अनेक वीर जवान आणि अधिकारी दिले आहेत. पंजाब पोलिसांपैकी तर ९० टक्के शीखच आहेत. सनदी अधिकारी होण्यासाठी केंद्रीय परीक्षा देऊन त्या उत्तीर्ण होणाऱ्या शिखांचे प्रमाण जास्त आढळेल. पगडीधारी शिखांनी या देशातील राष्ट्रपती, पंतप्रधान, लष्करप्रमुख, नौदलप्रमुख यांसारख्या पदांवर काम केलेले आहे. भारताच्या लोकसंख्येतील वाटा अवघा दोन टक्के असलेला एक समाज मायदेशाची इतकी अभिमानास्पद सेवा करतो आहे, ही केवळ शिखांनाच नव्हे तर भारतीयांनाही अभिमान वाटावा अशी बाब आहे.

कॅनडातच राहून खलिस्तान मागणाऱ्या शिखांची संख्या आणि त्यांचे प्रमाणसुद्धा, भारतातच राहणाऱ्या शिखांपेक्षा कितीतरी अधिक दिसते. तरीसुद्धा, कॅनडातही अशांची संख्या बहुमत म्हणावे इतकी नाही आणि भारतात तर ती नगण्यच आहे. भारतात खलिस्तानवादी म्हणून ज्या काही कारवाया हल्ली चालतात, त्या निव्वळ आदळआपटवजा आहेत. जाट शीख बहुसंख्येने शेती–व्यवसायात आहेत, त्या समुदायाला भिंद्रनवाले मारला गेल्यानंतरच्या दशकभरात खलिस्तानच्या मागणीत काडीचाही रस उरलेला नाही. मित्रदेश म्हणवता, तर तुमच्या भूमीवरून भारतविरोधी कारवायांना थारा देणे शोभत नाही, अशा अर्थाचे उद्गार भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी कॅनडाच्या सरकारला उद्देशून काढले, ते यामुळेच योग्य ठरतात. खलिस्तान हवे आहे ते भारताचा तुकडा तोडून. मग अशा फुटीर मागण्या मांडणाऱ्या कॅनेडियन शिखांना कॅनडाचे सरकार मोकळे रान कशासाठी देते आहे, हाही प्रश्न त्यानंतर आपसूक येतो. मात्र त्यांच्याशी एका मुद्दय़ावर मी सहमत नाही. जयशंकर यांनी कॅनडावाल्यांवर दुतोंडीपणाचा– ‘डबलस्पीक’चा आरोप केला आहे. पण हा असा दुतोंडीपणा केवळ कॅनडाच्याच राजकारणात चालतो का? मालेगावच्या मशिदीत घडवण्यात आलेल्या बॉम्बस्फोट कटातील आरोपी म्हणून जिच्यावर खटला सुरू होता, त्या प्रज्ञा ठाकूरला भोपाळ शहरातून लोकसभेचे तिकीट देणे, यासारखी आपल्याही ‘डबलस्पीक’ची उदाहरणे आपल्या आसपास नाहीत का? आपल्याला याच संदर्भात हेही आठवून पाहावे लागेल की, श्रीलंकेतील लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ ईलमला फूस लावल्याचा आरोप आपल्या ‘रॉ’वर केला जाई.. अर्थात पुढे त्या ‘एलटीटीई’ने राजीव गांधी यांची हत्या करून ‘गोतास काळ’ म्हणजे काय याचेच दर्शन घडवले, हा भाग निराळा. तर प्रश्न असा होता की, हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येचे सूत्रधार कोण? हा कुख्यात दहशतवादी, पंजाबातील अनेक अतिरेकी कारवायांच्या गुन्ह्यांसाठी तो हवा होता पण कॅनडात पळून गेला– तोही, ‘इंटरपोल’ने तो कुठेही सापडला तरी त्याला धरावे, अशा अर्थाची ‘रेड लेटर नोटीस’ काढलेली असूनसुद्धा कॅनडात पोहोचला. मग कॅनडाने, कदाचित राजकीय दबावामुळे असेल, पण त्याला कॅनेडियन नागरिकत्व दिले. व्हँकूव्हरच्या सरे भागातील गुरुद्वारा समितीच्या प्रमुखांना घालवून ती जागा निज्जरने स्वत: पटकावली. गुरुद्वारा समितीच्या निवडणुकीत हरलेल्या माजी प्रमुखांचा खून झाला, गुरुद्वारासमोरच त्यांचे प्रेत आढळले आणि मग काही दिवसांनी निज्जरही गोळीबारात ठार झाला. या आधीच्या (गुरुद्वारा प्रमुखांच्या) हत्येचा काहीही संबंध नसेल आणि निज्जरला मारण्यामागे कॅनडातच निर्माण झालेली सूडभावना नसेल, असे कसे का मानता येईल?

लेखक मुंबईचे माजी पोलीस आयुक्त असून पंजाबातील दहशतवादाशी लढण्यासाठी त्यांनी विशेष नियुक्तीवर काम केलेले आहे.

# सत्यमेव जयते फाऊंडेशनचा वाशीम जिल्हाधिकारी कार्यालयावर विशाल मोर्चा.

वाशिम – आकांक्षीत व आत्महत्याग्रस्त असलेल्या वाशिम जिल्हयाच्या सर्वांगीण विकासासाठी सत्यमेव जयते फाऊंडेशनच्या वतीने अध्यक्ष परमेश्वर अंभोरे यांनी शासनापुढे ५० मागण्याचे निवेदन ४ ऑटोंबर रोजी शेतकरी,सुशिक्षीत बेरोजगार, विद्यार्थीवर्ग आणी तळागाळातील वंचित बांधव आणि भगिनींच्या सहभागातून वाशीम जिल्हाधिकारी कार्यालयावर विशाल मोर्चा द्वारे देण्यात आले.

विशाल मोर्चा समोर अधिक माहिती देतांना अंभोरे म्हणाले की, वाशिम जिल्हा आकांक्षीत असून ७१ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यात वाशिमचा समावेश आहे. या जिल्ह्याचा मानवनिर्देशांक ०.६६ आहे. त्यामुळे जिल्हयाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी संघटनेच्या वतीने मोर्चाच्या माध्यमातून ५० मागण्याचे निवेदन देण्यात आले. त्यामध्ये,जिल्ह्यात कॅन्सर व मेडीकल कॉलेज सुरु करावे, मागेल त्याला शेतीपुरक व्यवसायासाठी कर्ज द्यावे, प्रत्येकाला कर्जासाठी सिबीलची अट रद्द करावी, जिल्हा रुग्णालयात १२८ स्लाईसची सीटी स्कॅन मशीन, थ्रीटी लोज्ड एमआरआय मशीन, २ डी इको व बायोप्सी मशीन द्यावी तसेच नवीन पलंग,गाद्या,पंखे, कुलरसह रुग्णालयाची रंगरंगोटी करावी, स्थानिक बेरोजगारांना प्राधान्य देवून जिल्ह्याचा शासकीय कर्मचार्यांचा अनुशेष १०० टक्के पुर्ण करावा, विकासकामात स्थानिक पुरवठादार व कंत्राटदारांना प्राधान्य द्यावे, जिल्हयातील विविध मार्गावर रोजगारासाठी टिनशेडचे व्यापारी संकुल बनवून बेरोजगारांना उपलब्ध करुन द्यावे, ५४२ इ क्लास शेतजमिनीवरील अतिक्रमण तात्काळ नियमानुकुल करावे, बेघरांच्या अतिक्रमीत शासकीय जागा नियमानुकूल करुन त्यांना घरकुलाचा लाभ द्यावा, शेतमालाला जागतीक बाजारपेठ उपलब्धतेसाठी आठवड्यातून दोनदा वाशीम ते मुंबई मालगाडी सुरु करावी, प्रत्येक तालुकयात शेतमालासाठी कोल्ड स्टोरेज उभारावे, जिल्हयातील सर्व एमआयडीसी मध्ये सुविधा देवून बेरोजगारांना प्राधान्य द्यावे, जि.प. मध्ये १५ व्या वित्त आयोगातील २५ टक्के तरतुदीनुसार बेरोजगारांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण द्यावे, मागेल त्याला १०० टक्के पशुपक्षी अनुदानावर उपलब्ध करुन हर घर गोठा योजनेची अंमलबजावणी करावी, जि.प. च्या मालकीच्या जागेवर व्यापारी संकुल उभारुन बेरोजगारांना उद्योगासाठी द्यावे, विविध शिष्यवृत्त्यांमध्ये तिप्पट वाढ करावी, सर्व महिला व पुरुष बचत गटांना पुर्वीप्रमाणे ५० टक्के अनुदानावर ४ टक्के व्याजदराने १० ते २० लाख कर्ज द्यावे, जिल्हयातील सर्व बसस्थानकांचे सुशोभिकरण करुन बसेसची संख्या वाढवावी व गाव तेथे एसटी सुरु करावी, पोलीस व आरोग्य कर्मचार्यांचे निवासस्थानांचे पुनरुज्जीवन करावे, जिल्हयाबाहेर असलेल्या ९ कार्यालयांना जिल्ह्यात सुरु करावे, फासेपारधी बांधवांना शासनाच्या जागेत पक्की घरे बांधून देवून आदिवासी लाभार्थी उद्दीष्ट ४० वरुन २०० करावे, बडनेरा वाशीम रेल्वेमार्ग जालनापर्यत न्यावा, सिंचनाची सोय असलेल्या शेतकर्यांना १०० टक्के अनुदानावर शेडनेट द्यावे, न.प. क्षेत्रातील भूखंडधारकांना त्यांच्याजवळील करारनामा किंवा नोटरीवरुन घरकुलाचा लाभ द्यावा, जिल्ह्यात संविधान सभागृहासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा, अनुसुचित जाती व जमातीच्या जात दाखल्यांमध्ये त्रुटीच्या नस्ती तात्काळ निकाली काढाव्या, कैंद्रीय शाळेला जागा उपलब्ध करुन देवून बांधकाम सुरु करावे, सरकारी महिला रुग्णालयात पुर्ण नौकरभरती करावी, न.प. हद्दीतील अतिक्रमण धारकांना टिनशेडचे गाळे बनवून अल्पदरावर वाटप करावे, छत्रपती संभाजीनगर जिल्हयाप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संगणक बस सुरु करुन विद्यार्थी व शेतकर्यांना मोफत संगणक प्रशिक्षण द्यावे, जिल्हयातून तापी व कृष्णा खोर्यात जाणारे पाणी थांबविण्यासाठी नियोजन करावे, मजूरांच्या हाताला काम देवून त्यांचे स्थलांतर थांबवावे, ४० वर्षावरील सर्व पदवीधरांना महिना ४ हजार बेरोजगार भत्ता द्यावा, वाशिम जिल्हा नानासाहेब देशमुख कृषी समृध्दी प्रकल्पात समाविष्ट करावा, भुयारी पाईपलाईनव्दारे पैनगंगा नदीचे पाणी प्रत्येक धरणात सोडण्यासह तलावातील गाळ काढावा, विशेष मोहीम राबवून मौलाना आझाद महामंडळाचे ३० लाखापर्यतचे कर्ज पुर्वीप्रमाणे महार जात दाखल असणार्यांना द्यावे, ६ फेब्रुवारी २०२३ च्या शासन निर्णयानुसार सर्व शाळा महाविद्यालयात भारताचे संविधान हा अभ्यासक्रम अनिवार्य म्हणून समाविष्ट करावा, सन २०१७–१८ पासून थकीत उपस्थिती भत्त्याचे १ ते ४ च्या विद्यार्थ्यांना त्वरीत वाटप करावा तसेच त्यात प्रतिदिवस ४० रुपये वाढ करावी, जिल्हयातील सर्व शेतकर्यांचे कृषीपंप विजबिल माफ करुन पुढील पाच वर्षे मोफत भारनियमनमुक्त विजपुरवठा करावा, संपुर्ण जिल्हा मानव विकासमध्ये समाविष्ट करावा, घरकाम करणार्या महिलांना कामगार कल्याण मंडळाचा लाभ द्यावा, जिल्हयात माजी सैनिकांसाठी सवलतीच्या दरात मिलीटरी सि.एस.डी. कॅन्टीन सुरु करावे तसेच प्रत्येक खाजगी रुग्णालयात माजी सैनिक आरोग्य योजना सुरु करावी, विरचक्रप्राप्त सुभेदार भिवसन लक्ष्मण अंभोरे यांचा अर्धाकृती पुतळा व गौरवगाथा रेल्वेस्टेशन समोर उभारुन त्यांचा सन्मान करावा. शेतकर्यांच्या कृषीपंप भाराचे स्थळ निरिक्षण करुन त्यांना योग्य बिल देण्यात यावे, जि.प. च्या सेवानिवृत्त शिक्षक व कर्मचार्यांचे निवृत्तीवेतन सुरु करुन त्यांना सातव्या वेतन आयोगाचे सर्व लाभ देण्यात यावे, पत्रकार संरक्षण कायद्याची कठोर अंमलबजावणी तसेच जाणीव जागृती करावी, कलावंतांना विविध योजनेचे मानधन महिन्याच्या सात तारखेपुर्वी देण्यात यावे, विविध महामंडळ आणि गटांकडून कर्ज घेतलेल्या जिल्हयातील बेरोजगारांचे सर्व कर्ज माफ करावे, जिल्हयातील सर्व गावांना शहराशी जोडण्यासाठी नकाशाप्रमाणे पक्के रस्ते तयार करावे. या पन्नास मागण्या या मोर्चाच्या माध्यमातून शासनाकडे निवेदनात देण्यात आल्या आहेत. मोर्चात जिल्ह्यातील शेतकरी,कष्टकरी,शेतमजूर, हमाल,बेरोजगार युवक,युवतीं मोठ्या संख्येने सामील झाले होते. त्या सर्वांचे सत्यमेव जयते फाऊंडेशनचे अध्यक्ष परमेश्वर अंभोरे यांनी आभार मानले.




**जिल्हयाच्या सर्वांगीण विकासासाठी अध्यक्ष परमेश्वर अंभोरे यांनी शासनापुढे पन्नास मागण्याचे निवेदन सदर केले.**

# जिममध्ये व्यायाम करताना हृदयविकाराचा झटका येऊ नये, म्हणून कोणती काळजी घ्यावी? वाचा, तज्ज्ञ काय सांगतात

तरुण वयात रक्तातील साखरेची पातळी वाढणे, वजन वाढणे, रक्तदाब किंवा खराब कोलेस्ट्रॉल वाढणे इत्यादी आरोग्याच्या समस्यांमुळे अनेक तरुण मंडळी जिमकडे वळतात. जिममध्ये जाऊन वजन कमी केल्यामुळे या सर्व समस्या दूर होतील, असा अनेकांचा समज असतो. जिममध्ये गेल्यानंतर अचानक शारीरिक क्रियांमध्ये बदल होतो, ज्यामुळे हृदयावर ताण निर्माण होऊ शकतो. याच कारणांमुळे जिममध्ये व्यायाम करताना अचानक मृत्यू होण्याचे प्रमाण वाढले आहेत. सध्या धावपळीच्या आयुष्यात चुकीच्या जीवनशैलीमुळे आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होतात. तरुण वयात रक्तातील साखरेची पातळी वाढणे, वजन वाढणे, रक्तदाब किंवा खराब कोलेस्ट्रॉल वाढणे इत्यादी आरोग्याच्या समस्यांमुळे अनेक तरुण मंडळी जिमकडे वळतात. जिममध्ये जाऊन वजन कमी केल्यामुळे या सर्व समस्या दूर होतील, असा अनेकांचा समज असतो. जिममध्ये गेल्यानंतर अचानक शारीरिक क्रियांमध्ये बदल होतो, ज्यामुळे हृदयावर ताण निर्माण होऊ शकतो. याच कारणांमुळे जिममध्ये व्यायाम करताना अचानक मृत्यू होण्याचे प्रमाण वाढले आहेत. याविषयी फोर्टिस हॉस्पिटलच्या कार्डिओलॉजीचे अतिरिक्त संचालक डॉ. अरुण कोचर यांनी 'द इंडियन एक्सप्रेस'शी बोलताना सविस्तर माहिती दिली.शारीरिक क्रियांमध्ये अचानक होणाऱ्या बदलांचा हृदयावर काय परिणाम होतो?जिममध्ये व्यायाम करताना शरीरावर अति प्रमाणात ताण पडत असेल तर हृदयाला थकवा जाणवू शकतो. रक्तदाब वाढल्यामुळे हृदयापर्यंत रक्त पुरवठा करण्यास अडचण येऊ शकते. यालाच कार्डियाक हेमोडायनामिक्स (रलपीारश्र लरीवळरल हरशोवूपराळली) म्हणतात ज्यामुळे व्यक्तीचा अचानक मृत्यू होऊ शकतो. भावनिक आणि शारीरिक तणावामुळेसुद्धा हृदयविकाराचा धोका वाढतो. हृदयाशी संबंधित आजारांमुळे अचानक हृदयाचे ठोके वाढू शकतात आणि हृदयाचे ठोके अनियमित होऊ शकतात, ज्यामुळे अचानक व्यक्तीला हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. काही तरुणांना हायपरट्रॉफीक कार्डिओमायोपॅथी ( कूर्शीीहिळल उरीवळोूरींहू) असू शकतो, हा एक दुर्मिळ अनुवांशिक आजार आहे. या आजारामध्ये व्यक्तीच्या हृदयाचे स्नायू मोठे आणि घट्ट होत जातात.रक्तातील साखरेची पातळी, रक्तदाब, कोलेस्ट्रॉल नियमित तपासणे गरजेचे आहे, कारण यामुळे थेट हृदयाला धोका निर्माण होतो. व्यसन आरोग्यासाठी चांगले नाही, त्यामुळे व्यसन करणे टाळा. जिममध्ये वजन उचलताना काळजी घ्या. व्यायाम करताना मध्ये मध्ये विश्रांती घ्या. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली स्टॅमिना वाढवण्याचा प्रयत्न करा.क्खखढ म्हणजे काय?क्खखढ म्हणजे हाय इन्टेसिटी इन्टरवल ट्रेनिंग (क्ळसह–खपींशपीळीं खपींर्शीीरश्र ढीरळपळपस) होय. हा व्यायामाचा एक प्रकार आहे. या व्यायामामुळे कमी कालावधीत शरीरावर जास्त परिणाम दिसून येतो. हल्ली तरुण मंडळी या व्यायामाच्या प्रकाराकडे जास्त आकर्षित होतात. पण, लक्षात ठेवा की थलेटिक्स कधीही अशा व्यायामाचा अवलंब करत नाही. नवीन लोकांनी व्यायामाचा हा नवीन प्रकार कधीही करू नये.२२० वजा वय हे तुमच्या एका मिनिटामध्ये हृदयाच्या ठोक्याचा जास्तीत जास्त आकडा असू शकतो. हे गणित नेहमी लक्षात ठेवावं. त्यामुळे व्यायाम करताना हृदयाचे ठोके तपासणे गरजेचे आहे.व्यायाम कसा करायचा? १. काय करावे? तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली स्टॅमिना वाढवण्याचा प्रयत्न करा.हृदयाशी संबंधित आजार होऊ नये म्हणून नियमित आरोग्य तपासणी करा.चांगले पोषक तत्वे असलेला आहार घ्या.

भरपूर पाणी प्या .व्यायाम नेहमी दिवसा करा. रात्रीचा व्यायाम करणे टाळा.भरपूर सूर्यप्रकाश घ्यावा.२. काय करू नये?

व्यायाम करताना शारीरिक क्रिया किंवा हालचालींचा अतिरेक करू नये.हृदय गती तपासत राहा.

व्यायाम करताना धूम्रपान किंवा मद्यपान करणे टाळा.

जर तुम्हाला व्यायाम करताना श्वास घेताना त्रास होत असेल, तुमच्या छातीत किंवा डाव्या खांद्यामध्ये दुखत असेल, तुमचा घसा दुखत असेल किंवा तुम्हाला पाठदुखीचा त्रास होत असेल तर या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका. लगेच डॉक्टरांकडे जा आणि तपासणी करा.

# सुमधुर दही

शरद, ग्रीष्म व वसंत ऋतूमध्ये दही खाणे हितकारक नसते. यामुळे कफ वाढून सर्दी, खोकला मागे लागतो. तसेच रात्रीदेखील दही खाऊ नये. उन्हाळा वाढू लागला की सर्वांची थंड सुमधुर दही खाण्याची इच्छा वाढते. परवा असेच एक रुग्ण चिकित्सालयात आल्यानंतर त्यांनी मला पहिलाच प्रश्न केला की, तुम्हा सर्व वैद्य मंडळींचे आणि दह्याचे काय वाकडे आहे? कोणत्याही वैद्याकडे गेले की तो प्रथम दही बंद करायला सांगतो. हवे तर त्याच दह्यापासून बनवलेले ताक चालेल, पण दही नको असे सांगतात. असे का बरे? दही आरोग्याला एवढे वाईट आहे का? मला त्यांच्या प्रश्नाचा अंदाज आला होता. त्यामुळे या विषयाच्या खोलात जाऊन माहिती देणे गरजेचे होते.खरंतर आजकाल सर्वांना कंपनीचे डब्यातील पॅकबंद दहीच मिळते. पूर्वीच्या काळी आजी दही लावायची. छान काळ्या मातीच्या मडक्यात उकळून कोमट झालेल्या दुधात सायंकाळी विरजण घातले व रात्रभर ठेवले की छान दही जमते. दही बनवण्याच्या पद्धती व त्याचा स्वाद यावरून त्याचे पाच प्रकार पडतात. मंद, गोड, आंबट–गोड, आंबट व अत्यंत आंबट असे हे पाच प्रकार. या प्रत्येक प्रकारानुसार, आजारानुसार व ऋतूनुसार दही सेवन केल्यास दह्याचे फार चांगले फायदे मिळतात. मात्र चुकीच्या पद्धतीने दही सेवन केल्यास नको असलेल्या आजारांनाही निमंत्रण मिळते. शरद, ग्रीष्म व वसंत ऋतूमध्ये दही खाणे हितकारक नसते. यामुळे कफ वाढून सर्दी, खोकला मागे लागतो. तसेच रात्रीदेखील दही खाऊ नये. खायचेच असेल तर त्यात तूप, साखर, मुगाची डाळ, मध किंवा आवळा घालून खावे. अदमुरे म्हणजे अर्धवट लागलेल्या दह्याला 'मंद दही' असे म्हणतात. याचेही सेवन करू नये. याने त्रिदोष वाढतात, तसेच पोट बिघडून वारंवार शौच व मूत्रप्रवृत्ती होते. आंबट व अत्यंत आंबट दहीसुद्धा सेवन करू नये. यामुळे अनेक पित्ताचे व अपचनाचे विकार मागे लागतात. म्हणजेच फक्त गोड व आंबट–गोड दही आपण खाऊ शकतो. जे दही चांगले लागले आहे, जे मधुर रसदार व थोडे आंबट असते त्याला गोड दही असे म्हणतात. हे दही उत्तम समजले जाते. हे शक्तिवर्धक असून यामुळे पचनशक्तीसुद्धा सुधारते. भूक वाढते. मात्र मधुमेह झालेल्या व्यक्तीने कोणत्याच प्रकारचे दही सेवन करू नये. यामुळे मेद धातू बिघडून वृक्कांवरसुद्धा ताण येतो व आजार अजूनच वाढतो. देशी गाईच्या दुधाचे दही सर्वोत्तम समजले जाते. म्हशीचे जड व रक्तदुष्टी करणारे असते, मात्र उत्तम, स्निग्ध व वीर्यवर्धक असते. तर बकरीच्या दुधाचे दही हे पचायला हलके, त्रिदोषनाशक, भूक वाढविणारे व अशक्तपणा घालविणारे असते. त्याचप्रमाणे दह्यावर येणारी 'सर' म्हणजे दह्याची निवळी ही सुस्ती घालविणारी, भूक वाढविणारी, मन प्रसन्न करणारी व तहान भागविणारी असते. यामुळे पोटसुद्धा छान साफ होते.सर्दी झाली असता दही खाऊ नये, कारण याने कफ वाढून सर्दी अजूनच वाढते. मात्र ताज्या दह्यामध्ये मिरी व गूळ घालून खाल्ल्यास सर्दी बरी होते. येथे दही हे औषधाला योग्य ठिकाणी घेऊन जाण्याचे काम करते. म्हणून सर्दी बरी होते. त्याचप्रमाणे मूतखडा झाल्यास गोखरूचे मूळ गोड दह्यासोबत सात दिवस दिल्यास तो फुटून बारीक होतो अथवा विरघळून जातो. पोटात मुरडा आला असल्यास गोड दह्याबरोबर थोडे शंखजिरे मिसळून द्यावे, याने तात्काळ आराम वाटतो.

# ओबीसी प्रवर्गात समावेश करण्यासाठी शिवा अखिल भारतीय वीरशैव लिंगायत संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

महाराष्ट्रात इतर समाजाने आरक्षण मिळावे यासाठी अनेक आंदोलने सुरु केले आहेत त्यामुळे लातूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर आज सोमवार दिनांक ९ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्रातील वीरशैव लिंगायत समाजातील हिंदू लिंगायत या जातीस अन्य मागास वर्ग आयोगाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरण क्रमांक ३२/ २०१४ मधील उर्वरित जातीचा त्वरित ओबीसी प्रवर्गात समावेश करण्यात यावा यासाठी आज धरणे आंदोलन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिवा अखिल भारतीय वीरशः लिंगायत युवा संघटनेच्या वतीने करण्यात आले.


लातूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर शिवा अखिल भारतीय वीरसे व युवा संघटनेच्या वतीने ओबीसी आज धरणे आंदोलन करण्यात येत असून धरणे आंदोलन करून आम्हाला न्याय नाही मिळाला तर येणार्या सोमवार दिनांक ३० ऑक्टोबर रोजी लातूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर शिवा संघटनेच्या वतीने प्रचंड असा धडक मोर्चा काढण्यात येणार असल्याचे शिवा संघटनेचे राज्य कार्यकारणी सदस्य दत्ताभाऊ खंकरे यांनी बोलताना सांगितले.

या धरणे आंदोलनात उमाकांत शेटे,दत्ताभाऊ खंकरे,सुभाष आप्पा मुक्ता,गणेश कारभारी, आनंदअप्पा खकारे, उमाकांत अनारर्गट्टे,ओमकार औराद, सुमित पारुडकर, रितेश राचट्टे,चंद्रकांता वैजापूरे, दिलीप अण्णा कत्ते,अंतेश्वर तोडकरी, विलास खिंडे,बालाजी पाटील नेत्रगावकर, राजकुमार बिरादार बामणीकर, विश्वनाथ बिरादार कौलखेडकर गणेश कारभारी, अनिल सोनटक्के,संजय देशमुख, प्रकाश मरतुळे जळकोट ,युवराज बिराजदार देवणी ,महेश पाटील वलांडीकर महादेव आप्पा कल्याणी अहमदपूर राम भातंबरे देवणी ,दादा पांडे रति कांत स्वामी ओमकार रटकलकर,महादेव आप्पा लामतुरे जगन्नाथ अप्पा कोळंबे, नागनाथ बिराजदार बामणीकर, शिवदास गंगापुरे, शरद चौधरी रेणापूरकर,कल्पनाताई बावगे,स्वरूपा स्वामी, शिवनंदा दोनाई,मीरा दामा, विनायादेवी बिराजदार, विमल शेटे, सरस्वती काळगापुरे, संगीता शेटे, मीनाक्षी मुंदडा,वर्षा दंडे, सुमन राऊत, आधी सह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता.




# लठ्ठपणावरील शस्त्रक्रियेसाठी उंची, वजनाबरोबर अन्य घटकही महत्त्वाचे, देशातील तज्ज्ञ डॉक्टरांचा निष्कर्ष

शस्त्रक्रियेद्वारे लठ्ठपणा कमी करताना संबंधित व्यक्तीला असलेले मधुमेह, उच्च रक्तदाब यांसारखे अन्य आजारही विचारात घ्यावेत, असा निष्कर्ष देशातील काही डॉक्टरांनी केलेल्या सर्वेक्षणातून काढण्यात आला आहे.



मुंबई : शरीराची उंची आणि वजन हे समीकरण ठरलेले आहे. त्यामुळे शस्त्रक्रियेद्वारे एखाद्या व्यक्तीचा लठ्ठपणा कमी करायचा असल्यास हे समीकरण लक्षात घेऊनच निर्णय घ्यावा लागतो. मात्र यापुढे शस्त्रक्रियेद्वारे लठ्ठपणा कमी करताना संबंधित व्यक्तीला असलेले मधुमेह, उच्च रक्तदाब यांसारखे अन्य आजारही विचारात घ्यावेत, असा निष्कर्ष देशातील काही डॉक्टरांनी केलेल्या सर्वेक्षणातून काढण्यात आला आहे.मुंबईसह देशातील बॅरिट्रिक तज्ज्ञांनी एकत्र येऊन देशातील लठ्ठ व्यक्तींचे एक सर्वेक्षण केले आहे. यामध्ये लठ्ठपणाने ग्रस्त १ हजार ४६ रुग्णांवर संशोधन करण्यात आले. हे सर्वेक्षण नुकतेच 'डायबिटीज ण्ड ओबॅसिटी इंटरनॅशनल' जर्नलमध्ये प्रकाशित करण्यात आले आहे. मुंबईमधील डॉ. अपर्णा गोविल भास्कर, नवी दिल्लीतील डॉ. अतुल एन. सी. पीटर्स, जालंधरमधील डॉ. जी. एस. जम्मू, अहमदाबादमधील डॉ. मनीष खेतान, चेन्नईतील डॉ. राज पलानीप्पन, पुण्यातील डॉ. शशांक शाह, बेंगळुरूमधील डॉ. शिवराम एच.व्ही. आणि कोईम्बतूरमधील डॉ. प्रवीण राज हे या सर्वेक्षणात सहभागी झाले होते. लठ्ठपणामुळे हृदय रोग, टाइप २ मधुमेह, कर्करोग, स्लीप एपनिया, वंधत्व, यांसह अन्य समस्यांचा धोका वाढतो. देशातील डॉक्टरांनी केलेल्या या सर्वेक्षणामध्ये सहभागी झालेल्या एक हजार ४६ जणांमध्ये ६३९ महिला आणि ४०७ पुरुषांचा समावेश होता. हे सर्वेक्षण १५ ते ९७ वर्ष वयोगटातील व्यक्तींमध्ये करण्यात आले. त्यातील ६६.६३ रुग्णांना लठ्ठपणा कमी करण्यासाठी शस्त्रक्रिया करण्याची आवश्यकता भासली आहे. त्याचबरोबर ६.९ टक्के लोकांचा लठ्ठपणा संतुलित आहार व व्यायामाद्वारे, तसेच ४.६ टक्के रुग्णांचा फार्माकोथेरपीद्वारे लठ्ठपणा कमी होऊ शकतो, असे निदर्शनास आले. लठ्ठपणाचे मूल्यांकन करताना फक्त वजन आणि बॉडी मास इंडेक्सबरोबरच (बीएमआय) वय, शारीरिक क्षमता, अन्य आजार, मानसिक आरोग्य, अनुवांशिक घटकांचा विचार करणे आवश्यक असल्याचे सर्वेक्षणातून स्पष्ट झाल्याचे डॉ. अपर्णा गोविल भास्कर यांनी सांगितले.राष्ट्रीय कुटुंब कल्याण विभागाने २०१९ ते २०२१ या कालावधीत केलेल्या सर्वेक्षणानुसार १५ ते ४९ वयोगटातील ६.४ टक्के महिला आणि ४ टक्के पुरुष लठ्ठपणाने ग्रस्त आहेत. तर पाच वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांमध्ये ९.४ टक्क्यांपर्यंत लठ्ठपणा आढळून आला. तसेच २०४० पर्यंत पुरुषांमधील लठ्ठपणाचे प्रमाण ९.५ टक्क्यांवर, तर महिलांमध्ये १३.९ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याची शक्यता या सर्वेक्षणातून व्यक्त करण्यात आली आहे.लठ्ठपणा कमी करण्यासाठी अन्य पर्याय संतुलित आहार आणि औषधांच्या माध्यमातून लठ्ठपणा कमी करता येऊ शकतो.

# ॲसिडिटी आम्लपित्तावर ज्येष्ठमधाचा उतारा

ज्येष्ठमध हे बहुगुणी औषध असून त्याचा वापर पित्तनाशक म्हणून देखील केला जातो. तसेच यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि बुद्धीदेखील तेजस्वी होते. आपली अन्नपचनक्रिया समतोल राखण्यावर आयुर्वेदचिकित्सा पद्धती आधारलेली आहे. त्या अन्नापासून रोज वात, पित्त आणि कफ हे तीन दोष, रस, रक्त, मांस, मेद, अस्थी, मज्जा आणि शुक्र हे सात धातू, लघवी, घाम आणि शौच हे मल निर्माण होतात. आपल्या भुकेचा मंदपणा, तीव्रपणा व विषमपणा लक्षात घेऊन आपल्या आहार पदार्थांना कफ, पित्त, वात नाशक पदार्थांची नित्य जोड दिली पाहिजे. यातील एक गुणी औषधी म्हणजे ज्येष्ठमध. प्राचीन काळापासून भारतीय पारंपारिक औषध प्रणालीने ओजस वाढवणाऱ्या विविध औषधी वनस्पतींच्या वापराला प्रोत्साहन दिले आहे. या औषधी वनस्पती संपूर्ण आरोग्य सुधारू शकतात. ते अँटीऑक्सिडंट्स, अँटी–इंफ्लेमेटरीज, इम्युनिटी बूस्टर इ. म्हणून काम करतात आणि आपल्या शरीरातील विषारी पदार्थांच्या ढिगाऱ्यापासून मुक्त होण्यास मदत करतात. ज्येष्ठमध वैज्ञानिकदृष्ट्या ग्लिसिरिझा ग्लाब्रा म्हणून ओळखले जाते. हे फॅबेसी कुटुंबातील आहे. ही वर्षभर उगवणारी आणि समशीतोष्ण प्रदेशात आढळणारी एक लहान औषधी वनस्पती आहे. लिरिस म्हणून देखील ओळखले जाते, मूळचे भूमध्य प्रदेशातील आहे. ग्लायसिरिझा हा शब्द ग्रीक शब्दापासून आला आहे जिथे ग्लायकोलचा अर्थ गोड आणि रायझा म्हणजे मूळ. आयुर्वेदाने ज्येष्ठमधाचे वर्णन अनेक औषधी गुणधर्म असलेली औषधी वनस्पती म्हणून केले आहे. मुळशी किंवा मुलेठी ज्याला आयुर्वेदात यष्टीमाशू असेही म्हटले जाते, सर्दी आणि खोकल्यावर उत्तम घरगुती उपाय मानला जातो.

# स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी, चोरीच्या गुन्ह्यातील ३ सराईत आरोपींना अटक. उहेझरीं २ मोटरसायकल, एक पाणबुडी मोटार, तीन मोबाईलसह ९७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त. ३ गुन्हे उघड.

लातूर :- स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी, चोरीच्या गुन्ह्यातील ३ सराईत आरोपींना अटक. या बाबत थोडक्यात हकीकत अशी की, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलिस अधिकारी लातूर शहर भागवत फुंदे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनला घडलेले मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरिता पोलीस अधिकारी व अमलदारांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते.

पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या मालमत्ता चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता विशेष पथके स्थापन करून गुन्हे उघड करण्याचे प्रयत्न सुरू होते .

त्याअनुषंगाने सदर पथके चोरीच्या गुन्ह्याच्या माहितीचे संकलन करून तपास करीत असताना दिनांक ०७ ऑक्टोंबर २०२३ रोजी संध्याकाळी पाच वाजता स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, लातूर शहरातील शास्त्रीनगर परिसरात काही व्यक्ती अगदी कमी पैशात त्यांच्याकडील मोबाईल विक्री करण्याच्या प्रयत्न करीत आहेत. अशी माहिती मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शास्त्रीनगर येथे पोहोचून कमी किंमतीत मोबाईल विक्री करण्याचा प्रयत्न करीत असलेल्या तीन इसमांना एक मोटार सायकलसह ताब्यात घेण्यात आले. त्यांना विश्वासात घेऊन विचारपूस केली तेव्हा त्यांनी त्यांचे नाव परमेश्वर निवृत्ती बोयणे, वय-२० वर्ष, राहणार शास्त्रीनगर, लातूर, विशाल चंद्रकांत गुळवे, वय १९ वर्ष, राहणार इकबाल चौक, लातूर, बाबा आजम पठाण, वय १९ वर्ष, राहणार शास्त्रीनगर, लातूर.

असे असल्याचे सांगून त्यांच्या ताब्यातील मोबाईल बाबत विचारपूस करून माहिती घेतली असता सदरचे मोबाईल नमूद आरोपींनी रात्रीच्या वेळी पाच नंबर ते औसा रोड जाणारे रोडवर पाय जाणाऱ्या इसमांना मारहाण करून जबरीने चोरी केल्याचे सांगितले .

आरोपीकडे आणखी तपास केला असता त्यांनी काही महिन्या पूर्वी पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीतून एक टीव्हीएस एक्स व पोलीस ठाणे लातूर ग्रामीण हद्दीतून पाण्याच्या पाणबुडी मोटारी चोरल्याचे कबूल केले. पोलीस ठाण्याच्या अभिलेखाची पाहणी केली असता पोलीस ठाणे एमआयडीसी येथे लुना चोरी बाबत एक गुन्हा दाखल असून, लातूर ग्रामीण पोलीस ठाण्यामध्ये पाणबुडी मोटारी चोरी बाबतचे गुन्हे दाखल असल्याचे समोर आले.




नमूद आरोपींकडून चोरीचे ३ मोबाईल, एक पाणबुडी मोटार, एक टीव्हीएस एक्सएल लुना व गुन्हे करतेवेळी वेळी वापरलेली एक मोटारसायकल असा एकूण किंमत ८७ हजार रुपयाचा मुद्देमाल नमूद आरोपींकडून हस्तगत करण्यात आला असून तीन चोरीचे गुन्हे उघड झाले आहेत.

यातील आरोपी सराईत गुन्हेगार असून अनेक पोलीस स्टेशन मधील विविध गुन्ह्यात सहभागी आहेत.

पुढील कार्यवाहीस्तव नमूद आरोपींना पोलीस ठाणे लातूर ग्रामीण यांचे ताब्यात देण्यात आले असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

तसेच आणखीन एक कारवाई करत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोबाईल चोरीमध्ये दोन महिलांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून चोरी केलेला १० हजार रुपये किंमतीचा मोबाईल जप्त करण्यात आला असून दोन महिलाविरुद्ध पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे दाखल असलेल्या गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे. पुढील तपास शिवाजीनगर पोलीस स्टेशन करीत आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात सहाय्यक फौजदार संजू भोसले, पोलीस अमलदार रामहरी भोसले, योगेश गायकवाड, सुधीर कोळसूरे, सिद्धेश्वर जाधव, राजेश कंचे, राहुल सोनकांबळे, मनोज खोसे, नितीन कठारे, प्रदीप चोपणे यांनी पार पाडली.

# शिवरत्न जिवाजी महाले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी



लातूर :-- आज दिनांक ०९/१०/२०२३ रोजी सकाळी साईनाथ मित्र मंडळ लातूर च्या वतीने नांदेड रोडवरील (गरुड चौक ) शिवरत्न विर जिवाजी महाले चौकात शिवरत्न जिवाजी महाले यांची ३८८ वि जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली या वेळी शिरत्न जिवाजी महाले यांच्या प्रतिमेचे माजी नगरसेवक बाळासाहेब कटके,बालाजी गवळी ,लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे यांच्या हस्ते पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले या वेळी नाभिक एकता महासंघ मराठवाडा अध्यक्ष बालाजी गवळी,दीपक गंगणे, नाभिक एकता महासंघाचे जिल्हाध्यक्ष विशाल माने ,गणेश श्रीमंगले,गणेश टाकळे,,सुरेश संगापुडे,अमोल गायकवाड,बाबू डोपारे,नवनाथ कोरे,गणेश घोडके ,आदी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत साने गुरुजी माध्यमिक विद्यालय विजेता १४ वर्षे वयोगटातील मुलींचा संघ विभागासाठी पात्र

लातूर : येथील स्वामी विवेकानंद विद्यालय एमआयडीसी, लातूर येथे झालेल्या व क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय लातूर यांच्या वतीने आयोजित जिल्हा स्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेत साने गुरुजी माध्यमिक विद्यालयातील १४ वर्ष वयोगटातील मुलींच्या संघाने बाजी मारली. अंतिम सामन्यांत श्री श्री रविशंकर विद्यालयावर सहज मात करत साने गुरुजी माध्यमिक विद्यालयाचा संघ विभागीय साठी पात्र ठरला आहे. विजेत्या संघामध्ये बुगनर श्रध्दा, माने प्रतिक्षा, तुंगीकर वैष्णवी, गरड चैताली, पवार कोमल, सालगुडे प्राची, माने गौरवी, बिरादार स्वाती, मोटे संयोगिता, थोरात शुभांगी,




बंडगर ऋतुजा, नवगरे पंकजा, साबळे तेजस्विनी,

शिकलकर अफसिन व शेवाळे तनुजा या विद्यार्थिनीचा सहभाग होता. या यशस्वी खेळाडूंचे संस्था सचिव कालिदास माने , प्रशासकीय अधिकारी जी. टी. माने व श्रीमती उषा आडे, मुख्याध्यापक शेख आय. एच, क्रीडा शिक्षक लहाडे डी. के. जाधव एस. एम. व शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# महाराष्ट्र महसूल कर्मचारी संघटनेच्या छ. संभाजीनगर विभागाच्या सहसचिव पदी मंजूर पठाण यांची बिनविरोध निवड



लातूर :-महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेच्या छत्रपती संभाजीनगर विभागाच्या सहसचिव पदी मंजूर पठाण यांची बिनविरोध निवड.पठाण मंजुर युसुफ हे अ.का.जिल्हाधिकारी कार्यालय लातुर येथे कर्मचारी आहेत यांची महाराष्ट्र राज्य महसुल कर्मचारी संघटनेच्या राज्य कार्यकारणीतील सह सचिव छत्रपती संभाजीनगर विभाग या पदावर बिनविरोध निवड झाल्याबदल अशोक हनवते संपादक, दैनिक महावृत्त, रघुनाथ बनसोडे संपादक, लातूर प्रभात, इस्माईल शेख संपादक न्यूज नामा चॅनलचे यांनी अभिनंदन केले.

# चलो बुद्ध धम्म की ओर अभियानचे प्रणेते ॲड.शिवराज कोळीकर यांचा भव्य सत्कार.

बदलापूर / प्रतिनिधी :- चलो बुद्ध धम्म की ओर अभियानाचे राष्ट्रीय अध्यक्ष ड.शिवराज कोळीकर सर नांदेड यांनी गेल्या ३०-३२ वर्षापासून ४० हजार पेक्षा जास्त मातंग,भटके विमुक्त समाजातील लोकांना धम्मदीक्षा देण्याचं महान कार्ये पार पाडले आहे. त्यांच्या या धम्मकार्याचा उचित गुण गौरव आणि भव्य सत्कार १ ऑक्टोंबर २०२३ ला बदलापूर येथील सर्व निष्ठावंत बौद्ध जनांच्या वतीने ड.शिवराज कोळीकर सर यांना सन्मानपत्र, स्मृती चिन्ह,शाल,गौरवनिधी व पुष्पुच्छ देवून सत्कार करण्यात आला. बदलापूर येथील क्रांतिकारी आंबेडकर विचारांचे जेष्ठ कामगार नेते धम्म उपासक मान. वाय. आर.लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली बदलापूर येथे ०१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पाच वाजता म्हसकर गुप्ते हॉल पहिला माळा,घोरपडे चौक बदलापूर येथे संपन्न झाला.बदलापूर येथील पूज्यनीय भंतेजी महेंद्रबोधी यांनी उपस्थित जनसमुदायाला त्रिशरण,पंचशील देवुन थोडक्यात धम्म देशना देवुन कार्यक्रमाची सुरवात झाली. या वेळी प्रमूख मान्यवर आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ नेते,फुले,आंबेडकर विचाराचे भाष्यकार मान.सुरेश केदारे साहेब,पत्रकार,साहित्यिक,कामगार नेते मान.सागर तायडे,भारतीय बौद्ध महासभा केंद्रीय शिक्षक मान.बी.एल.सावंत,वंचित बहुजन आघाडी बदलापूर महिला शहर अध्यक्षा आयु.काजलताई यादव,भवतु सब मंगलमचे धम्म प्रचारक शांतु डोळस,घाटकोपर रिपाई नेते तालुका अध्यक्ष राजाभाऊ गांगुर्डे,सत्कार मूर्ती ड.शिवराज कोळीकर यांच्या पत्नी आयु.वंदनाताई कोळीकर,मान्यवरांनी विचारपिठावरून चलो बुद्ध धम्म की ओर अभियानचे प्रणेते मान.ड.शिवराज कोळीकर यांच्या धम्म प्रचार व धम्म दीक्षा कार्याबाबत गुणगौरव उद्गार काढून मार्गदर्शन केले. यावेळी ड.शिवराज कोळीकर सत्कार संयोजन समितीचे बदलापूर विभागातील सर्व पदाधिकारी,सल्लागार,निमंत्रक रामदास पहुरकर,मान.ज्ञानेश्वर गोतावळे, मान. विजय निकम,मान.संजय कांबळे, मान. जसकेतन आर्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित होते. सत्कार संयोजन समितीचे उपाध्यक्ष मान. महेंद्रकुमार मिसळे यांनी सर्व उपस्थित जनसमुदायाला भोजनदान दिले.सत्कार संयोजन समितीचे प्रमुख सल्लागार अन् महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कवी गायक मान.मास्टर राजरत्न राजगुरु साहेब आणि आद.इंगळेजी,आद. डॉ. नंदकुमार कांबळेजी यांनी आपल्या पहाडी आवाजात क्रांतिगीते सादर केली.

सत्कार संयोजन समितीचे निमंत्रक मान. रामदास पहुरकर यांच्या पत्नी आयुष्यमती प्रमिला ताई यांनी आपली तब्येत अत्यंत गंभीर असताना देखील सत्कारमूर्ती ड.शिवराज कोळीकर यांच्या पत्नी वंदनाताई कोळीकर यांचा साडी,शाल,पुष्पुच्छ देवुन सत्कार केला. तेव्हा सभागृहातील उपस्थित जनसमुदायानी उभे राहून प्रमिला ताईच्या धाडसाच कौतुक केले,त्यांच्या ह्या आंबेडकरवादी विचारांच्या धम्मनिष्ठेला सर्वांनी मानाचा मुजरा केला. तसेच पवार कॉम्प्लेक्स मधील महिला शैला मोरे,सरला हिरामण मोरे,जयश्री लोंढे,बोरसे ताई यांनी कोळीकर दाम्पत्याचा साडी, ड्रेस,शाल,पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. घाटकोपर येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते दिवाण सर, प्रवीण बर्वे यांनी ड.कोळीकर यांचा सत्कार केला. सत्कार संयोजन समितीचे सहसचिव सुनीलराज सैदाणे यांच्या वतीने बुध्द आणि त्याचा धम्म ह्या महान अन् पवित्र ग्रंथाचे वाटप करण्यात आले. बदलापूर येथील स मा ज से व क मान.बळीराम जाधव यांचा त्यांच्या सामाजिक योगदाना बद्दल पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात आ ला . स त का र समारंभ कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सचिव राजु विघे व संजय कांबळे यांनी केले.




कार्यक्रमाच्या शेवटी समितीचे निमंत्रक आद.ज्ञानेश्वर गोतावळे यांनी आभार मानले.आंबेडकरवादी बंधू भगिनी नी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोठ्या संख्येने सहकार्य केलं, परिश्रम घेतले समितीच्या त्या सर्व पदाधिकारी आणि सभासदांचे हार्दिक अभिनंदन आणि ज्यांनी ज्यांनी आर्थिक योगदान दिले त्या मान्यवर देणगीदारांचे आयु वाय आर लोंढे अध्यक्ष-ड.शिवराज कोळीकर सत्कार संयोजन समिती,बदलापूर यांनी खुप खुप आभार मानले.

# पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यक्तिमत्व विकास घडायला हवा - प्रा. डॉ. ज्ञानेश्वर चौधरी

मुरुड / महेंद्र आल्टे : पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यक्तिमत्व विकास घडायला हवा तरच त्या ज्ञानाला खरी किंमत आहे तसेच मार्केटमध्ये सगळे महाग आहे परंतु महाविद्यालयात सर्व मोफत मिळते याचीही जाणीव आजच्या विद्यार्थ्यांना असायला हवी. व्यावहारिक ज्ञानाबरोबरच लेखन, खेळ यातूनही विद्यार्थ्यांनी स्वतःला घडवले पाहिजे. यश प्राप्त करत असताना कष्टाने प्राप्त केले पाहिजे मात्र कष्टाचा मार्ग अवघड असतो. तसेच विद्यार्थ्यांनी वाचन कौशल्य आत्मसात करून अवांतर वाचन करणे गरजेचे आहे. महाविद्यालयात फुकट चुकायची संधी आहे. पण या चुकांतूनच शिकणे देखील आवश्यक आहे असे प्रतिपादन प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. ज्ञानेश्वर चौधरी यांनी केले. संभाजी कॉलेजमध्ये आयक्यूएसी विभागाच्या व पालक व माजी विद्यार्थी मेळावा समितीच्या वतीने दि. ०७/१०/२०२३ रोजी पालक व माजी विद्यार्थी मेळावा संपन्न झाला. सदरील मेळावा कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. श्री. संतोष राऊत, सहाय्यक आयुक्त, कौशल्य विकास मंत्रालय, मुंबई यांची उपस्थिती होती तर प्रा. डॉ . ज्ञानेश्वर चौधरी, महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. तसेच मा.श्री. बी. एस. (दादा) पटाडे, अध्यक्ष, समाज




जागृती शिक्षण संस्था मुरुड, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.आर.एफ.अंबाड, मा.श्री.मनोज जोशी, माजी विद्यार्थी, मा.श्री. संजय नाडे, पालक शिक्षक संघ यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मा.मनोज जोशी, मा.अमर मोरे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.पैठणकर एन.एल.यांनी केले. प्रास्ताविक प्रा.गायकवाड एम.बी.यांनी केले तर आभार प्रा.सौ.महाजन पी.बी. यांनी मानले. पालक व माजी विद्यार्थी मेळाव्यास मोठ्या संख्येने पालक व माजी विद्यार्थी उपस्थित होते. सदरील मेळावा यशस्वी करण्यासाठी पालक व माजी विद्यार्थी मेळावा समितीचे प्रमुख प्रा.पैठणकर एन .एल., प्रा. डॉ.अंबाड आर. एफ., प्रा. सौ.महाजन पी. बी., प्रा .सहालुगडे आदींनी परिश्रम घेतले.



बहुजन समाज पार्टीचे संस्थापक मान्यवर काशीराम जी यांच्या स्मृतिदिनानिमित्त बहुजन समाज पार्टी लातूर जिल्ह्याच्या वतीने अभिवादन करण्यात आले त्यावेळी पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्राध्यापक विश्वनाथ आलटे लातूर जिल्हा प्रभारी उदय सोनवणे सिद्धार्थ सूर्यवंशी उपाध्यक्ष ज्योतीराम लामतुरे कोषाध्यक्ष शंकर जाधव लातूर शहर विधानसभा अध्यक्ष रणधीर सुरवसे BVF चे रोहित शृंगारे सुभाष सूर्यवंशी व इतर सर्व पदाधिकारी उपस्थित होते

# जिल्हाधिकारी यांच्या संकल्पनेतून लातूर जिल्हा मध्यवर्ती कारागृहामध्ये बंदी बांधवांसाठी १० दिवसीय विपश्यना शिबीर संपन्न

लातूर (जिमाका) : जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकुर घुगे यांनी दिनांक २ सप्टेंबर, २०२३ रोजी लातूर जिल्हा मध्यवर्ती कारागृहास भेट दिली असता १८ ते ४५ वयोगटातील अनेक तरुण कैदी येथे असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले, या तरुणाशी संवाद साधला असता हे तरुण दिशाहीन असून त्यांच्यासाठी दिशादर्शक वाटचालीसाठी मार्गदर्शन करणे आवश्यक असल्याचे लक्षात आले. कैद्यांमधील सूडाची भावना नष्ट करून मैत्रीभाव वाढला पाहिजे या जाणीवेतून जिल्हाधिकारी यांनी लातूर विपश्यना समितीच्या माध्यमातून लातूर येथील मध्यवर्ती कारागृहात विपश्यना शिबीराचे दि. २९ सप्टेंबर, २०२३ ते ९ ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत सकाळी आणि रात्री ४० बंदी बांधवांसाठी आयोजन करण्यात आले. या शिबिरासाठी साधक कैद्यांची कारागृहातच स्वतंत्र राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच कैद्यांना साधनेसाठी स्वतंत्र ऑडिओ व्हिज्युअल (-र्ींवळे तळीींरश्र) सुसज्ज असा धम्म साधना कक्ष देखील तयार करण्यात आला होता.

लातूर विपश्यना समितीचे २ आचार्य व ३ सहायक हे देखील कैदी

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE